


**Celebration of National Mathematics Day on 22nd December 2021**



# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस साजरा

**सवना (वार्ता)**

श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद संचलित श्री विठ्ठल रूक्मिणी महाविद्यालय सवना येथे आधुनिक महानतम गणित विचारक श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म दिवस हा राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला. गणित विभागाच्या वतीने श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म दिवस गणित दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत शं. महल्ले तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुरेल झोड, नव नॅक समन्वयक प्रा. प्रदीप जैस्वाल, डॉ. स्वाती ताथोड, प्रा. गौरव काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे [illegible] श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करण्यात येवून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राजरत्न कांबळे यांनी केले.

त्यांनी विद्यार्थ्यांना गणित विषयाचे महत्त्व व उपयोग समजावून सांगितले प्रमुख वक्ते डॉ. सुरेल झोड यांनी रामानुजन यांचे जीवनचरित्र उलगडून दाखवले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हेमंत महल्ले म्हणाले, श्रीनिवास रामानुजन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे महान आधुनिक गणितज्ज्ञ असून त्यांनी गणित विषयाचे फारसे प्रशिक्षण सुध्दा घेतलेले नसून बालपणापासूनच ते अतिशय कुशाग्र बुद्धीचे होते गणित विश्लेषण व संख्या सिध्दांत क्षेत्रात त्यांचे फार मोठे व अतुलनीय योगदान आहे.

त्यांनी ३७८४ प्रमेयांचे संकलन केलेले असून इंग्रज विद्वान जी. एच. हार्डी यांनी त्यांना नेचुरल जिनिअस असे म्हटलेले आहे. त्यांनी दिलेले गणित सिध्दांत आजपर्यंत पूर्णपणे सोडविता आलेले नाही अशा अलौकिक आपल्या देशातील या गणिततज्ज्ञाला मी विनम्र अभिवादन करतो यांचे अंशात्मक गुण घेतल्यास हा विषय कठीण न-वाटता सोपा वाटेल व आयुष्याचे गणित सहज सुटेल असे महत्वाचे उद्बोधनात्मक भाषण केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भौतिक शास्त्र विभागाच्या प्रा. कु. पल्लवी नरवाडे यांनी केले. कोरोनाचे नियम पाळून कार्यक्रम सुयशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या [illegible] विभागाने परिश्रम घेतले.




**Celebration of National Mathematics Day on 22nd December 2022**



**Inauguration of Mathematical Society**



**Invited Talk by Dr. Sanjay R. Bhoyar, Dept. of Math. Phulsing Naik Mahavidyalaya, Pusad**




**Educational tour at Dr. BAMU, Chhatrapati Sambhaji Nagar**




**Students Visited to Department of Mathematics and learned the procedure to get admission to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chh. Sambhaji Nagar**

**Students participated in Avishkar 2022 for district level (Yavatmal) and got Second prize at district level (Yavatmal) Avishkar and selected for university level at Amravati. Also participated in university level at Amravati.**








# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय अव्वलस्थानी

सवना (वार्ता)- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ जिल्हास्तरीय आविष्कार २०२२ ही स्पर्धा दिनांक १४ डिसेंबर रोजी अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ येथे आयोजित केली होती. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाशी संबंधित पोस्टर व मॉडेल स्पर्धेत सादर केलेत. यात श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद द्वारा संचालित श्री विठ्ठल-रुक्मिणी महाविद्यालय सवना येथील अविष्कार समन्वयक प्रा. कुणाल दोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले मॉडेल सादर केले. तसेच महाविद्यालयातील प्रा. अनिल खाडे यांनी सुद्धा आपले मॉडेल सादर केले. गणित विषयाचे प्रा. राजरतन कांबळे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. राणी आसोले, कु. साक्षी कदम यांना यांनी आपले मॉडेल अविष्कार मध्ये सादर करून द्वितीय पारितोषिक मिळाले तसेच महाविद्यालयातील प्रा. अनिल खाडे यांनी आविष्कार मध्ये प्रथम पारितोषिक मिळविले. त्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महाडे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे हे गौरव आणि मॉडेल आहे दुसऱ्या फेरी करिता विद्यापीठ स्तरावरील स्पर्धे करिता प्रथम क्रमांकावर निवडले गेले आहे त्या स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे शुभेच्छा देण्यात आल्यात दुसऱ्या फेरीला विद्यापीठ स्तरातील वरील स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ या ठिकाणी १६ डिसेंबरला होणार आहे त्या स्पर्धेतही आम्ही अवश्य अव्वल स्थानी राहू असे विद्यार्थ्यांनी ग्वाही दिली.




Department organized online Guest lecture of Dr. Nitesh Ghungarwar, Asst. Professor, Shri D.M. Burungale Science and Art College, Shegaon, Dist-Buldhana on the topic "Philosophical Reflections on the curiosity of the Universe".




Online presentation by Guest Dr. N. G. Ghungarwar



# विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयात ऑनलाईन गेस्ट लेक्चर



**Mathematics Poster Presentation by the students**